शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ● रविवार, २४ ऑगस्ट २०२५

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २१ ● अंक ३१७ ● पाने १४ (कोलाजसह) ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in



मुंबई महापालिकेची प्रभागरचना जाहीर

पान : महामुंबई



रोहित-विराट अजूनही भारतीय एकदिवसीय संघाचा भाग

पान : क्रीडा

## ढोल – ताशांच्या गजरात गणेशमूर्तींचे मंडपात आगमन



**मुंबई :** गणेशोत्सवाला काही दिवस उरले असून मुंबईतील अनेक गणेश मंडळांनी मूर्ती मंडपात नेण्यास सुरुवात केली आहे. शहर व उपनगरातील ९६ मंडळांनी शनिवारी लेझिम, ढोल – ताशांच्या गजरात गणेशमूर्ती मंडपात नेल्या. या मिरवणुका पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्यावर गर्दी केली होती. अनेक मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सवापूर्वीच गणेश आगमन मिरवणुका काढण्याची पथ्या रूढ झाली आहे. मुंबईतील विविध ठिकाणच्या ९६ मंडळांची गणेशमूर्ती शनिवारी वाजतगाजत मंडपस्थळी मार्गस्थ झाली. यंदा शासनाने मोठ्या आवाजातील वाद्यांवर बंदी घातल्याने पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्तींचे आगमन झाले. अनेक मंडळांनी मिरवणुकीत ढोल – ताशा, लेझिमचा वापर करून पारंपरिक पद्धतीने मिरवणुका काढल्या.

चांदिवलीचा राजा, मरोळचा मोरया, गोरेगावचा महाराजा, विघ्नहर्ता एल्फिन्स्टनचा, विक्रोळीचा गणराज, अँटॉप हिलचा राजा, मालाडचा महागणपती, भटवाडीचा राजा आदी विविध गणेश मंडळांच्या मूर्तींचे आगमन झाले. दादर, भांडुप, मुलुंड, चेंबूर, अंधेरी आदी भागांमध्ये वाहनचालकांना विलंबाचा सामना करावा लागला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गर्दी नियंत्रित करण्यासाठी अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.





# भारत - अमेरिका टपाल सेवा स्थगित

## ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफनंतर भारताचा निर्णय

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेल्या ५० टक्के व्यापार करामुळे अमेरिका आणि भारतामध्ये काहीसा तणाव निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भारताने रशियन तेल खरेदी थांबवावी यासाठी ट्रम्प सातत्याने भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. पण डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दबावाला भारत जुमानत नाही. दरम्यान, ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफच्या निर्णयानंतर आता भारताने क्रांतिकारी पाऊल उचलत अमेरिकेच्या दडपशाहीपुढे भारत झुकणार नसल्याचा अप्रत्यक्ष संदेश ट्रम्प यांना दिला आहे. भारताने अमेरिकेला जाणारी टपाल सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाची जगात चर्चा सुरू आहे. खरे तर अमेरिकेचे दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्या निर्णयामध्ये प्रामुख्याने टॅरिफची (आयात शुल्क) जगभरात मोठी चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी डोनाल्ड



ट्रम्प यांनी भारतावरही जवळपास ५० टक्के टॅरिफ लादले आहे. एवढेच नाही तर भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून डोनाल्ड ट्रम्प भारतावर सातत्याने टीकाही करत आहेत.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या वाहतुकीवर परिणाम करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारने आणलेल्या प्रमुख नियामक बदलांना प्रतिसाद म्हणून भारताच्या पोस्ट विभागाने शनिवारी २५ ऑगस्ट २०२५ पासून अमेरिकेला जाणाऱ्या बहुतेक आंतरराष्ट्रीय टपाल सेवा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याची घोषणा केली आहे.

जारी केलेल्या निवेदनानुसार, अमेरिकन प्रशासनाने ३० जुलै २०२५ रोजी एक कार्यकारी आदेश जारी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये ८०० अमेरिकन डॉलर्सपर्यंतच्या वस्तूंसाठी शुल्कमुक्त किमान सवलत मागे घेण्यात आली होती. जी पूर्वी कमी किमतीच्या वस्तूंना सीमाशुल्काशिवाय अमेरिकेत प्रवेश करण्याची परवानगी होती. मात्र, आता परिणामी अमेरिकेला जाणाऱ्या हवाई कंपन्यांनी २५ ऑगस्ट २०२५ नंतर पोस्टल कन्साइनमेंट स्वीकारण्यास असमर्थता दर्शविली आहे. कारण त्यांच्याकडे ऑपरेशनल आणि तांत्रिक तयारीचा अभाव असल्याचे कारण सांगितले जात आहे. आता अमेरिकेत जाणाऱ्या सर्व टपाल वस्तूंना, त्यांची किंमत काहीही असो, कस्टम ड्युटी भरावी लागेल. ही ड्युटी आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायदाअंतर्गत देश-विशिष्ट टॅरिफ नियमांवर आधारित आकारली जाईल. तथापि, $१०० पर्यंतच्या भेटवस्तूंना या ड्युटीतून सूट असेल.

### पोस्टाचा ग्राहकांसाठी संदेश

पोस्ट विभागाने म्हटले आहे की, 'सध्याची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच सेवा पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न केले जातील. तोपर्यंत नागरिकांनी धीर धरण्याची विनंती आहे'. भारत – अमेरिका यांच्यातील वाढत्या व्यापार तणावाचा फटका थेट सर्वसामान्य ग्राहकांना बसला आहे. पोस्ट सेवा स्थगितीमुळे अमेरिकेत नातेवाइकांना, व्यवसाय भागीदारांना किंवा ग्राहकांना पाठवल्या जाणाऱ्या पार्सल्स व पोस्ट तात्पुरती थांबली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या ५० टक्के टॅरिफचा फटका अनेक उद्योगांना बसत असल्याचे चित्र आहे. भारतीय वस्त्रोद्योगावर त्यामुळे मोठे संकट निर्माण झाले असून त्याची निर्यात ठप्प झाली आहे.

# 'कोकणवासीयांचे आभार मानण्यासाठीच यंदा दोन मोदी एक्स्प्रेस'

## दादरमधून विशेष गाडी रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत रवाना

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

कोकण व मुंबई ठाण्याचे एक अतूट नाते असून कोकणाचा माणूस मुंबईत व मुंबईचा माणूस हा कोकणात असतो. कोकणाचे व भाजपचेही एक अतूट नाते असून लोकसभा व विधानसभा निवडणुकीतही कोकणी माणसाने भाजपला व महायुती सरकारला भरभरून साथ दिली आहे. त्यांचे आभार मानण्यासाठीच यंदाही आपण कोकणवासीयांसाठी मोदी एक्स्प्रेस सोडली असल्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी शनिवारी सांगितले. दादर स्थानकातून शनिवारी मोदी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवल्यावर नितेश राणे यांनी कोकणवासीयांचे धन्यवाद मानले.

दादर रेल्वे स्थानकातून भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री नितेश राणे यांनी दादर ते सावंतवाडी दरम्यान विशेष मोदी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी बोलताना नितेश राणे म्हणाले की, लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकात महायुतीच्या पारड्यात लोकांनी भरभरून मते दिली. तशाच पद्धतीने येणाऱ्या महापालिकांच्या निवडणुकांतही कोकणी माणूस हा महायुतीच्याच बाजूने उभा राहील, असा विश्वासही मंत्री राणे यांनी व्यक्त केला.

कोकण हा महायुतीचा गड ओळखला जातो. गणेशोत्सव काळात कोकणवासीयांची कोकणात जाताना गैरसोय होते, हे पाहता गेली १३ वर्षे आम्ही कोकणात विशेष बस व रेल्वे उपलब्ध करून देतो. मात्र या वर्षी लोकसभा व विधानसभेला जनतेने दिलेला कौल पाहता या वर्षी डबल धमाका असून आम्ही दोन रेल्वे उपलब्ध करून दिल्या आहेत. आज मुंबईहून रत्नागिरी व सावंतवाडीसाठी गाडी असून रविवारी (दि. २४ ऑगस्ट) कणकवली व वैभववाडीसाठी गाडी सोडणार आहोत. सध्या गणेशोत्सवासाठी रस्ते, रेल्वे, विमानाने कोकण गाठणाऱ्या कोकणवासीयांसाठी आपण येणाऱ्या काळात जलवाहतूकही उपलब्ध करून देणार असल्याचे नितेश राणे यांनी स्पष्ट केले.





### मंत्री राणे यांचा प्रवाशांशी मनमोकळेपणाने संवाद

दादर स्थानकात स्वतः नितेश राणे यांनी डब्यात चढून प्रवाशांशी मनमोकळेपणाने संवाद साधला व त्यांना प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या. नितेश राणे यांचे प्रेम पाहून आबालवृद्धांसह प्रवासीही भारावून गेले होते.

### कोकणवासीयांना प्रेमाने बोला

कालच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोकणवासीयांना यापुढे चाकरमानी न म्हणता कोकणवासीय म्हणा, असा सल्ला दिला. त्यावर बोलताना नितेश राणे यांनी सांगितले की, कोकणवासीयांना चाकरमानी म्हणा, गाववाले म्हणा वा कोकणवासी म्हणा; परंतु ते प्रेमाने म्हणा. कोकणवासी हा प्रेमळ माणूस असून म्हणूनच त्याला शहाळ्याची उपमा दिली जाते. वरून किती कठोर असला तरी आतून कोकणी माणूस हा प्रेमळच असतो. त्यामुळे जे काही म्हणाल ते प्रेमाने म्हणा, असे नितेश राणे म्हणाले.





## पाकिस्तानी विमानांना २४ सप्टेंबरपर्यंत हवाई क्षेत्रात बंदी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला होता. भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले. दरम्यान, भारताने पाकिस्तानी विमानांवर भारतीय हवाई हद्दील प्रवेश नाकारला होता. अजूनही पाकिस्तानी विमानांसासाठी भारताने हवाई क्षेत्र २४ सप्टेंबरपर्यंत बंद केले. दुसरीकडे, पाकिस्ताननेही भारतीय विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र २४ सप्टेंबरपर्यंत बंद केले. हवाई क्षेत्र बंद करण्यासाठी दोन्ही देशांनी एअरमेनना स्वतंत्र नोटीस जारी केली आहे. भारताने ३० एप्रिलपासून आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. यामध्ये पाकिस्तानी विमान कंपन्या आणि ऑपरेटर्सद्वारे चालवल्या जाणाऱ्या, मालकीच्या किंवा भाड्याने घेतलेल्या विमानांचा समावेश आहे, यामध्ये लष्करी उड्डाणांचा देखील समावेश आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध घेतलेल्या विविध उपाययोजनांचा भाग म्हणून ही बंदी सुरुवातीला २४ मेपर्यंत होती.

## अनिल अंबानीच्या घरावर सीबीआयची धाड

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

ईडी चौकशीनंतर, आता सीबीआयने १७ हजार कोटी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात अनिल अंबानींशी संबंधित ठिकाणांवर झाडाझडती केल्याने अनिल अंबानींच्या अडचणी वाढल्या आहेत. सीबीआयने शनिवारी सकाळी ७ वाजल्यापासूनच अनिल अंबानींच्या घरावर छापेमारी सुरू केली आहे. सीबीआयचे ७ ते ८ अधिकाऱ्यांनी सकाळी ७ वाजल्यापासूनच घराची तपासणी केली. अनिल अंबानी कुटुंबासह घरातच उपस्थित होते.

कफ परेड सीविंड येथील त्यांच्या घरी सकाळीच सात ते आठ वाजण्याच्या सुमारास काही अधिकारी पोहोचले. तेव्हापासून त्यांच्या घराची झाडाझडती सुरु झाली. अनिल अंबानी आणि त्यांचे कुटुंबही घरात होते. यापूर्वी ईडीने अनिल अंबानी यांची चौकशी केली होती.

या छापेमारीपूर्वी सीबीआयने दोन एफआयआर दाखल केले होते. यानंतर, ईडीने अनिल अंबानींच्या ठिकाणांवर छापा टाकला होता. यानंतर आता, सीबीआयही तपास करत आहे. हा छापा १७ हजार कोटी रुपयांच्या कथित बँक कर्ज घोटाळ्यासंदर्भात आहे.





### १७ हजार कोटींच्या बँक कर्ज घोटाळाप्रकरणी कारवाई!

जे आर्थिक वर्ष २०१७ ते २०१९ दरम्यान यस बँकेने अनिल अंबानींच्या कंपन्यांना बेकायदेशीरपणे कर्जाच्या स्वरुपात ट्रांसफर केले होते. तत्पूर्वी, ईडीने रिलायन्स ग्रुपचे चेअरमन तथा एमडी अनिल अंबानी यांना, कथित १७ हजार कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळाप्रकरणी सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर चौकशीसाठी बोलावले होते. यापूर्वी, ईडीने देखील अनिल अंबानींशी संबंधित व्यावसायिक संस्थांवर छापे टाकले होते. तेव्हा रिलायन्स समूहाशी संबंधित ५० व्यावसायिक संस्था आणि २५ व्यक्तींच्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले होते. हे छापे २४ जुलै रोजी मुंबईत किमान ३५ ठिकाणांवर टाकण्यात आले होते.

## महाराष्ट्रातील १ कोटी बहिणी होणार लखपती दीदी

### 'माझा भाऊ देवाभाऊ' अभियानांतर्गत राखी प्रदान सोहळ्यात मुख्यमंत्र्यांकडून घोषणा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

लखपती दीदींसाठी देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच नेतृत्वाखाली महाराष्ट्रात येत्या काळात एक कोटी बहिणींना लखपती दीदी केल्याशिवाय राहणार नाही. महिलांना सक्षम करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करायचे आहे. यासाठी केंद्रातील एनडीए सरकार आणि राज्यातील महायुती सरकार विविध योजना आखत आहेत. विरोधक कितीही टीका करोत पण महिलांसाठी सुरू केलेली एकही योजना पुढची पाच वर्षे बंद होणार नाही, अशी ग्वाही विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली. भारतीय जनता पार्टीच्या 'माझा भाऊ देवाभाऊ' या अभियानाचा भाग म्हणून जिल्हाभरातील लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासाठी प्रेमपूर्वक पाठविलेल्या हजारो राख्या सुपूर्त करण्याचा सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

लाडक्या बहिणींनी पाठवलेल्या राख्या मुख्यमंत्र्यांनी सन्मानपूर्वक स्वीकारल्या. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला. यावेळी सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आ. विद्या ठाकूर, मंदा म्हात्रे, कालिदास कोळंबकर, अमित साटम, संजय उपाध्याय, कॅप्टन तमिळ सेल्वन, सुलभा गायकवाड, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. संजय केनेकर, माधवी नाईक, राजेश पांडे, ज्येष्ठ नेत्या कांता नलावडे, नीता केळकर, प्रा. वर्षा भोसले आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला राज्यभरातून लाडक्या बहिणी उपस्थित होत्या.





### बहिणींच्या प्रेमामुळेच कुणाचीही भीती नाही

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यभरातील बहिणींच्या राख्या माझ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आगळ्यावेगळ्या पद्धतीने हा कार्यक्रम राबवण्यात आला त्याबद्दल धन्यवाद. मला जन्मभर या बहिणींच्या ऋणातच रहायचे आहे, त्यांचे उतराई व्हायचे नाही. या राख्यांना भाषा, धर्म, पंथ, जात नाही, निरपेक्ष प्रेमाच्या ह्या राख्या प्रतीक आहेत. इतक्या बहिणींचे प्रेम ज्याच्यापाशी आहे अशा माझ्यासारख्या भावाला कुणाचीही भीती नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी लाडक्या बहिणींच्या प्रेमाची दखल घेतली. लाडक्या बहिणींच्या मताला व्होट चोरी म्हणणारेच सर्वात मोठे चोर आहेत अशी प्रखर टीका फडणवीस यांनी केली. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. चित्रा वाघ, मंत्री आशीष शेलार यांची भाषणे झाली.

## गणेशोत्सवासाठी रात्रभर रस्त्यावर धावणार बेस्टच्या बस

### दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची गैरसोय टळणार



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्यासाठी केवळ मुंबईतलेच नाही तर महाराष्ट्रासह देश-विदेशातूनही भाविक, पर्यटक गर्दी करतात. या काळात सार्वजनिक वाहतुकीवर ताण येतो. विशेषतः रात्री उशिरापर्यंत दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांसाठी वाहतुकीची गैरसोय होते. याच पार्श्वभूमीवर बेस्ट उपक्रमाने अतिरिक्त बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत दररोज रात्री ११ वाजल्यापासून पहाटे ५ वाजेपर्यंत विशेष बस धावणार आहेत.

बेस्ट उपक्रमाकडून सोडण्यात येणाऱ्या अतिरिक्त बस दहा मार्गांवर सुरु राहतील. विशेष लक्ष शिवाजी पार्क, गिरगाव चौपाटी व मरीन लाइन्स या प्रमुख ठिकाणी जाणाऱ्या मार्गांवर केंद्रित करण्यात आले आहे. कांदिवली, बोरिवली, वांद्रे, मुलुंड, वडाळा, दादर व देवनार आगारांतून या बस सोडल्या जाणार आहेत. प्रत्येक मार्गावर सरासरी तीन बस धावतील, तर काही महत्त्वाच्या मार्गांवर दोन बसची अतिरिक्त सोय असेल. देश-विदेशातूनही अनेक पर्यटक मुंबईतील गणेश दर्शनासाठी येतात. मुंबईतील सार्वजनिक, प्रसिद्ध गणेश मंडळे आणि गणेशोत्सव मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्यासाठी गर्दी करतात.

दिवसा बेस्ट उपक्रमाच्या बसगाड्या पुरेशा उपलब्ध असतात. रात्रीच्या वेळी कमी प्रमाणात बेस्टच्या सेवा उपलब्ध असतात. त्यामुळे भाविक आणि पर्यटकांसाठी ७ ते १६ सप्टेंबर या कालावधीत रात्रीच्या वेळी अतिरिक्त बस चालविण्याचा निर्णय उपक्रमाने घेतला आहे.

फोर्ट, गिरगाव, चर्नी रोड, भायखळा, लालबाग, परळ या परिसरांत गर्दी होते. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी या अतिरिक्त बससेवा दिल्या जाणार आहेत. प्रशासनाने आवाहन केले आहे, की गणेशोत्सव काळात गर्दी टाळण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करावा. उपलब्ध करून दिलेल्या विशेष बससेवांचा लाभ घेतल्यास वाहतूक कोंडी टाळता येईल आणि प्रवास अधिक सुरक्षित होईल, असेही बेस्टकडून सांगण्यात आले आहे.

### 'या' मार्गावर उपलब्ध असणार बससेवा

कुलाबा परिसरातून उत्तर-पश्चिम मुंबईकडे गिरगाव, लालबाग, परळ, चेंबूरमार्गे बस चालविण्यात येणार आहेत. बसमार्ग क्रमांक ४ मर्या. जे.जे रुग्णालय ते ओशिवरा आगार, ८ मर्या. जिजामाता उद्यान ते शिवाजी नगर, ए – २१ डॉ. एस. पी. एम. चौक ते देवनार आगार, ए –२५ बॅकबे आगार ते कुर्ला आगार, ए-४२ कमला नेहरू पार्क ते सॅण्डहर्स्ट रोड स्थानक, ४४ वरळी व्हिलेज ते एस. यशवंते चौक (काळाचौकी), ६६ इलेक्ट्रिक हाऊस ते सांताक्रूझ आगार, ६९ डॉ. एस.पी.एम. चौक ते पी.टी. उद्यान, शिवडी, व सी –५१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते काळाकिल्ला आगार या बसमार्गावर रात्रीच्या जादा बस फेऱ्या धावतील, अशी माहिती बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आली.

### एमएसआरटीसी मुंबईहून कोकणात ५,२०० विशेष बस चालवणार

गणेश चतुर्थी उत्सव जवळ येताच मुंबई, ठाणे आणि पालघर येथील कोकणात जाणाऱ्या भाविकांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ला मोठी पसंती दर्शविली आहे. परिवहन मंत्री आणि एमएसआरटीसीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या मते, गणपती उत्सवासाठी ४,४७९ गट आरक्षण बसेससह ५,१०३ विशेष बसेस आधीच पूर्णपणे बुक झाल्या आहेत.

## अकरावीच्या प्रवेशासाठी मंगळवारपासून अंतिम फेरी



**मुंबई :** इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील अंतिम फेरी मंगळवार (दि. २६) ते शनिवार (दि. ३०) या कालावधीत होणार आहे. आतापर्यंत प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ही अंतिम फेरी असणार आहे. या अंतिम विशेष फेरीअंतर्गत ॲलॉटमेंट शुक्रवारी (दि. २९) जाहीर होणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी सांगितले.

राज्यात एकूण नऊ हजार ५२८ कनिष्ठ महाविद्यालये असून प्रवेश क्षमता २१ लाख ५४ हजार ६९२ इतकी आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी १४ लाख ७१ हजार ७४७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून आतापर्यंत १२ लाख ७८ हजार ४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. इयत्ता अकरावीच्या प्रवेशातील अंतिम विशेष फेरीअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयांना नव्याने नोंदणी आणि वाढीव प्रवेश क्षमता नोंदणी करण्यासाठी शनिवारपर्यंतची मुदत देण्यात आली होती. त्यानंतर अंतिम विशेष फेरीसाठी सोमवारी (दि. २५) रिक्त जागांचा तपशील जाहीर केला जाणार आहे.

## कर्नाटक काँग्रेस आमदार केसी वीरेंद्र यांना ईडीकडून अटक

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

कर्नाटक काँग्रेसचे चित्रदुर्ग मतदारसंघातील आमदार केसी वीरेंद्र यांना ईडीने शनिवारी गंगटोकमध्ये अटक केली. त्यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन व ऑफलाइन बेटिंगमध्ये सहभाग असल्याच्या आरोप आहे. केसी वीरेंद्र त्यांच्या सहकाऱ्यांसह सिक्कीममधील गंगटोकला गेले होते. तिथे त्यांनी कथितरित्या एका कॅसिनोसाठी जमीन भाड्याने घेतली होती. ईडीने त्यांच्याशी संबंधित ३० ठिकाणांवर छापा टाकले होते. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी त्यांना अटक केली. या कारवाईत १२ कोटी रुपये रोख रकमेसह १ कोटी परकीय चलन, ६ कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व १० किलो चांदीच्या वस्तू आणि ४ वाहने जप्त केली होती. ईडीने त्यांची १७ बँक खाती आणि दोन बँक लॉकर गोठवले आहेत. वीरेंद्र यांचा भाऊ केसी नागराज व त्यांचा मुलगा पृथ्वी एन राज यांच्या घरातूनही त्यांच्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

## मटका अड्ड्यावरील छाप्यानंतर पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

# सिंधुदुर्गातील भावी पिढीसाठी मंत्री नितेश राणे आक्रमक

◆ **सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी):**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली येथील मटका अड्ड्यावर पालकमंत्री नितेश राणे यांनी स्वतः धाड टाकल्यानंतर सिंधुदुर्ग पोलीस ॲक्शन मोडवर गेले आहेत. जिल्ह्यातील सर्व मटका जुगार अड्डे थांबवले गेले असून दर दिवशी होणारा लाखो रुपयांचा चुराडा या कारवाईमुळे थांबविला गेला आहे. कणकवलीचे पोलीस निरीक्षक यांचे या प्रकरणात झालेले निलंबन जिल्ह्यातील सर्व अवैध धंद्यांना रोखण्यासाठी महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

- **दिवसभर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात अनेक ठिकाणी पोलिसांची छापेमारी.**
- **गुटका, दारू, विक्रीवरही कारवाई**
- **मटका ठप्प त्यामुळे लाखो रुपयांचा चुराडा थांबला.**
- **दारू, मटका, जुगार अड्ड्यांवर सिंधुदुर्ग पोलिसांची छापेमारी व अटक सत्र सुरू.**





जिल्ह्यातील दारू मटका जुगार या अवैध धंद्यांवर पोलीस दलाने छापेमारी सुरू केली आहे. अनेक ठिकाणी या कारवाया पोलिसांनी केल्या आहेत. कणकवलीमधील घेवारी यांच्या मटका अड्ड्यावर पालकमंत्री नितेश राणे यांनी घातलेली धाड जिल्ह्यातील सर्व बेकायदेशीर कृत्ये रोखण्यासाठी दिशा देणारी ठरली आहे. नशेली पदार्थांच्या रॅकेटमुळे सिंधुदुर्गची भावी पिढी बरबाद होता नये, यावर पोलिसांनी अंकुश ठेवावा, असे स्पष्ट आदेश पालकमंत्री नितेश राणे यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन दिले होते.

### कारवायांचा दणका :

पोलीस दलाचे प्रमुख जिल्हा पोलीस अधीक्षक मोहन दहीकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणी व स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा अशा यंत्रणेकडून शनिवारी पूर्ण दिवस जिल्हाभर या कारवाया करण्यात आल्या आहेत. संशयित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल झाले असून अटक सत्र ही सुरु झाल्याची माहिती प्रवीण कोल्हे यांनी दिली.



**सोन्याचा भाव**

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | १,०१,६२० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९३,१५० रुपये |



**चांदीचा भाव**

| | |
|---|---|
| प्रति किलो | १,३०,००० रुपये |